# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26



# छोट्या-छोट्या उद्योगातून आपण आत्मनिर्भर बनले पाहिजे : प. पू. अदृश्य काडसिध्देश्वर स्वामी

▲पाटण, दि. ३ : दुसऱ्या कोणावरही अवलंबून न राहता छोट्या छोट्या उद्योगातून आपण स्वतः आत्मनिर्भर बनले पाहिजे. त्यासाठी श्रीराम नागरी सहकारी पतसंस्था आहेच. पतसंस्थेचा कारभार अत्यंत सचोटीने, चिकाटीने पारदर्शकपणे सुरू आहे. सभासदांसाठी संस्था चांगले उपक्रम राबवत असते. आपल्या शेतीत उत्पादन खर्च कमी करून उत्पन्न वाढवले तरच शेतकऱ्यांचे भले होईल. त्यासाठी शेतकऱ्यांनी श्रीराम नागरी पतसंस्थेचा उपयोग करावा आणि आत्मनिर्भर बनावे, असे आवाहन प. पू. अदृश्य काडसिध्देश्वर स्वामी यांनी केले.

येथील श्रीराम नागरी सहकारी पतसंस्था पाटण या संस्थेच्या हिरक महोत्सवी वर्षानिमित्त कै. वि. स. तथा भाऊ मोकाशी सभागृहात सभासदांना भेटवस्तू वाटप कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी सार्वजनिक व बांधकाम मंत्री विक्रमसिंह पाटणकर होते. यावेळी, कराड अर्बन बँकेचे उपाध्यक्ष शशांक पालकर, अमरसिंह पाटणकर, दिलीपसिंह पाटणकर युवा नेते याज्ञसेन पाटणकर, पंचायत समिती सदस्य शंकरराव घाडगे, चेअरमन हिंदुराव सुतार, व्हाइस चेअरमन सूर्यकांत प्रभाळे, व्यवस्थापक लहु माने यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी प्राथमिक तत्वावर ११ ज्येष्ठ सभासदांना मान्यवरांच्या हस्ते भेट वस्तूचे वाटप करण्यात आले.

प. पू. काडसिध्देश्वरस्वामी म्हणाले, आज प्रत्येक क्षेत्रात सहकार रुजला आहे. सहकारापासून कोणतेही क्षेत्र वंचित राहिलेले नाही. सहकार चळवळीतून अनेक संस्था उभ्या राहिल्या. सर्वांत जास्त महाराष्ट्रात सहकार चळवळ यशस्वी झाली. सहकार चळवळ मोठ्या प्रमाणात रुजल्याने कालांतराने सहकारात अपप्रवृत्ती आली. त्यामुळे अनेक बँका बुडाल्या. तद्नंतर विदेशी बँका भारतात आल्या. अशा परिस्थितीतही आजच्या घडीला श्रीराम नागरी सहकारी सारख्या संस्था चिकटीने टिकून राहिल्या, त्यांच्यावर कोणताही परिणाम झाला नाही. आज विक्रमसिंह पाटणकर दादांच्या मार्गदर्शनाखालील सर्व संस्था चांगल्या प्रकारे सुरु आहेत. छोट्या व्यवसायातून सुरुवात केली तर पुढे मोठे उद्योजक होतील. उत्पादन खर्च कमी केला तर शेतकऱ्यांचे भले होईल. गरजा आणि अपेक्षा याचा संसारात ताळमेळ घालता आला पाहिजे. आपल्या गरजा जास्त आहेत. लोकांकडे पाहून गरजा वाढवू नका. आज आरोग्याबाबत आपण आजार विकत घेतले आहेत. प्रत्येकाला आजार आहे. विषमुक्त खात नाही तोपर्यंत आरोग्य चांगले चालणार नाही. त्यासाठी सेंद्रीय शेती करा. रासायनिक शेतीमुळे निसर्ग बिघडला आहे. लागणारी खते स्वतः तयार करा, असे त्यांनी सांगितले.

माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर म्हणाले, उत्कृष्ठ काम करणारी पतसंस्था म्हणून श्रीराम पतसंस्थेची सर्वत्र ओळख आहे. संस्थेच्या प्रगतीचा सभासदांना लाभ मिळावा यासाठीचा हा भेटवस्तूचा उपक्रम कौतुकास्पद व इतरांसाठी प्रेरणादायी आहे. ज्या काळात संस्था नव्हत्या त्या काळात संस्था स्थापन करून ती नावारूपास आणली. आज अनेक मोठ्या संस्था कार्यरत आहेत, नावाप्रमाणे त्यांचा आतील कारभार चांगला नाही. आपण अनेक संस्था, कॉलेज यशस्वीरित्या चालवत आहोत हा अभिमानास्पद बाब आहे. रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न करावे लागणार आहेत. पाटण महोत्सवातून अनेक संधी मिळाल्या. कष्ट घेतले तर पुढे मोठे उद्योजक निर्माण होतात. कष्ट करणारा माणूस पाहिजे. शेती क्षेत्रातही मोठे काही तरी करता येईल. ऑरगॅनिक शेतीसाठी तालुक्यात स्कोप आहे. विषमुक्त शेती झऱ्याच्या पाण्यावर करता येईल, असे त्यांनी सांगितले.

चेअरमन हिंदूराव सुतार यांनी स्वागत केले. दीपकदादा पाटणकर यांनी प्रास्ताविक केले. विलासराव क्षीरसागर यांनी आभार मानले. कार्यक्रमास पाटण अर्बन बँकेचे संचालक दिलीपराव मोटे, दूध संघाचे चेअरमन सुभाषराव पवार, खरेदी-विक्री संघाचे चेअरमन अॅड. अविनाश जानुगडे, विलासराव क्षीरसागर, राजेंद्र, संजय हिरवे, चंद्रकांत शिर्के, मोरणा पतसंस्थेचे चेअरमन नथुराम मोरे, उपव्यवस्थापक भीमराव माने यांच्यासह पतसंस्थेचे सर्व संचालक, संचालिका, सभासद, कर्मचारी, ठेवीदार, ग्राहक, विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

सभासदांना भेटवस्तू वाटप करताना प. पू. अदृश्य काडसिध्देश्वर स्वामी, विक्रमसिंह पाटणकर, समवेत दिलीपसिंह पाटणकर, शशांक पालकर, याज्ञसेन पाटणकर, हिंदूराव सुतार, सूर्यकांत प्रभाळे.